# श्री गणेशमूर्ती शास्त्रानुसार आणि सात्त्विक असावी !



## अनुक्रमणिका


卐 आध्यात्मिक परिभाषेतील प्रस्तावना ! ८

卐 मनोगत १०

१. देवतेची सात्त्विक मूर्ती आणि तिचे लाभ १२

२. श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी पुजावयाची मूर्ती कशी असावी ? १३

३. सनातन-निर्मित सात्त्विक श्री गणेशमूर्ती, तिची वैशिष्ट्ये आणि उपयोग २६

४. गणेशमूर्ती बनवतांना ठेवायचा भाव, करायच्या प्रार्थना अन् पाळायचे नियम ३६

५. धर्मशास्त्रानुसार वर्तन करणे, हे खरे धर्माचरण ! ५०

६. गणेशोत्सव मंडळांनो, लोकप्रियतेसाठी नव्हे, तर लोककल्याणासाठी उत्सव साजरा करा ! ५३

७. सनातनची ‘गणेशोत्सव जागृती चळवळ’ ! ५७

८. सनातनच्या गणेशमूर्तीप्रमाणे मूर्ती बनवण्याचा प्रयत्न करणारे ‘श्री गणेश कला केंद्र’ ! ६१

# मनोगत

'गणराज रंगी नाचतो... नाचतो...' गणरायाच्या आगमनाचे वेध आबालवृद्धांना भाद्रपदाच्या पुष्कळ आधीपासूनच लागतात. श्री गणेशमूर्ती घडवण्यापासून गणेशोत्सवाची सिद्धता चालू होते. गणेशोत्सव हा आनंदोत्सव आहेच, पण गणेशतत्त्वाचा मोठ्या प्रमाणावर लाभ करून घेण्याची ती सुवर्णसंधीच आहे.

श्री गणेशमूर्ती सात्त्विक, अर्थात धर्मशास्त्रानुसार असेल, तरच गणेशतत्त्वाचा मोठ्या प्रमाणावर लाभ होतो. सध्या गरुडावर बसलेला गणेश, क्रिकेट खेळणारा गणेश अशा विविध रूपांत अन् मोठमोठ्या आकारांत गणेशमूर्ती बनवल्या जातात. अशा अशास्त्रीय मूर्तींमुळे गणेशतत्त्वाचा लाभ तर होत नाहीच, पण श्री गणेशाचा अनादर मात्र होतो. या अनादरास मूर्तीकार, भाविक अन् गणेशोत्सव मंडळे कारणीभूत ठरतात. या अनादरामुळे हिंदूंना समष्टी पाप लागते. हे समष्टी पाप लागू नये आणि गणेशोपासना योग्य

प्रकारे व्हावी, या हेतूने प्रस्तूत लघुग्रंथात श्री गणेशमूर्ती शास्त्रानुसार बनवण्याने होणारे लाभ; मूर्तीकार, भाविक, तसेच गणेशोत्सव मंडळे यांनी घ्यावयाची दक्षता आदींविषयी विवेचन केले आहे.

सनातन संस्था-निर्मित गणेशमूर्ती ही सात्त्विक अन् आदर्श कशी आहे, हे सांगून ती बनवण्यासाठी लागणारी आवश्यक मापेही लघुग्रंथात दिली आहेत. या मापांनुसार बनवलेली सात्त्विक श्री गणेशमूर्ती नेहमीसाठीही घरात ठेवणे लाभदायी आहे.

या लघुग्रंथाप्रमाणे आचरण करून सर्वांनाच श्री गणेशाचा अधिकाधिक आशीर्वाद प्राप्त करून घेता यावा, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

**टीप :** लघुग्रंथात काही सूत्रांच्या (मुद्यांच्या) शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.